| MHJN040007182009 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | २६ | ०५ | २००९ |
| | नोंदणी दिनांक | : | २६ | ०५ | २००९ |
| | निकाल दिनांक | : | ३० | ०३ | २०२६ |
| | कालावधी | : | १६ व. | १० म. | ०४ दि. |

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.१, अंबड यांचे न्यायालयात

(पिठासीन न्यायाधीश – एस.एस. जैन )

**नि. फौ. ख. क्र. ५००११५/२००९** **नि. क्र.९६**

(प्रथम खबर अहवाल क्रमांक – २९/२००९)
(अपराध कलम – भा.दं.वी चे कलम १४३, १४७, १४८, ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७, सहकलम १४९ तसेच, म.पो.का.कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र, पोलीस ठाणे – गोंदी)

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस ठाणे, गोंदी
ता. अंबड, जि. जालना. ... **अभियोग पक्ष**

**श्री. बी. ई. निकम सहा. सरकारी अभियोक्ता.**

**– विरुध्द –**

१. नयुम बाबाखॉ पठाण, वय–१९ वर्षे,
२. सय्यद मुक्तार स. गफुर, वय–१९ वर्षे,
३. अयुब महम्मद पठाण, वय ३५ वर्षे,
४. साहेबखॉ फत्तेखॉ (मयत – उपशमीत)
५. सय्यद गफुर स. अकबर, वय–६५ वर्षे,
६. सय्यद रूस्तूम स. गफुर, वय– २२ वर्षे,
७. शेख शफीक शे. सालार, वय–२१ वर्षे,
८. स. सत्तार स. गफुर, वय – २४ वर्षे,
९. शे. अजमोद्दीन शे. सालार, वय– २२ वर्षे,
१०. सय्यद नजीम स. फयाज, वय– २३ वर्षे,
११. शेख रशिदाबी शे. सालार, वय–५० वर्षे,
१२. सय्यद आशानाबी स. गफुर, वय – ५५ वर्षे,
सर्व रा. डोनगाव, ता. अंबड, जि. जालना ... **आरोपी**

**श्री. एम. आर. तारडे आरोपींचे विधीज्ञ**

| | |
|---|---|
| अपराध दिनांक | १२.०३.२००९ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १२.०३.२००९ |
| दोषारोपपत्र दिनांक | २५.०५.२००९ |
| दोषारोप ठेवल्याची दिनांक | १४.०२.२०१८ |
| पुरावा आरंभ झाल्याची दिनांक | २४.०२.२०२६ |
| न्यायनिर्णयाची राखीव दिनांक | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | ३०.०३.२०२६ |
| शिक्षा लादलेली असल्यास दिनांक | निरंक. |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष किंवा दोषी | लादलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नयुम बाबाखॉ पठाण | १२/०३/२००९ | १२/०३/२००९ | भा.द.विं. कलम १४३,१४७,१४८, ४५२,३२४,३२३, ५०४, ५०६,४२७ सहकलम १४९ तसेच, म.पो.का.कलम १३५ प्रमाणे | निर्दोष | निरंक | --- |
| २. | सय्यद मुक्तार स. गफुर | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | --- |
| ३. | अयुब महम्मद पठाण | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | --- |
| ४. | साहेबखॉ फत्तेखॉ | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | मयत | मयत | --- |
| ५. | सय्यद गफुर स. अकबर | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | --- |
| ६. | सय्यद रूस्तूम स. गफुर | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | --- |
| ७. | शेख शफीक शे. सालार | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | --- |
| ८. | स.सत्तार स. गफुर | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | --- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९. | शे. अजमोद्दीन शे. सालार | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | --- |
| १०. | सय्यद नजीम स. फयाज | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | --- |
| ११. | शेख रशिदाबी शे. सालार | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | --- |
| १२. | सय्यद आशानाबी स. गफुर | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | --- |

## अ. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी :-

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.-१ | शेषराव धनाजी ढेरे (नि.क्र.८१) | पंच साक्षीदार |
| सा.क्र.-२ | बाबु उर्फ बाबुराव बाजीराव साबळे (नि.क्र.९०) | फिर्यादी |
| सा.क्र.-३ | बंडू बाजीराव साबळे (नि.क्र.९२) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| सा.क्र.-४ | विमलबाई बाबुराव साबळे (नि.क्र.९४) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |

## ब. आरोपीच्या साक्षीदारांची यादी :-

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

## क. न्यायालयीन साक्षीदार :-

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| - | - | - |

## निशाणी क्रमांकाची यादी :-

## अ. अभियोगपक्ष :

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | ९१ | फिर्यादीची फिर्यादवरील सही |

## ब. बचावपक्ष:

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | ८८ | समेटपत्र |

## क. न्यायालयीन निशाणी :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | ५१ | दोषारोप |
| २ | ५२ ते ६२ | आरोपींचे दोषारोपावरील निवेदन |

## ड. मुद्देमाल :

| अ.क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | -- | २ बनीयान, २ शर्ट, १ लूंगी |

## न्यायनिर्णय
(दिनांक ३०/०३/२०२६)

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –**

१. फिर्यादी बाबुराव बाजीराव साबळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दि.१२.०३.२००९ रोजी ५.०० वाजेच्या सुमारास मौजे डोनगाव, ता. अंबड, जि. जालना येथे आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण करण्याच्या उद्देशाने गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादी व साक्षीदार यांना लाठया, काठया व लोखंडी सळई व दगडाने मारहाण करून जखमी केले, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व घरात बेकायदेशीररित्या प्रवेश करून मारहाण केली, शिवीगाळ केली व घरातील सामानाची नासधुस केली, अशी फिर्याद त्याने गोंदी पोलीस स्टेशन येथे नोंदविली.

२. वरील आशयाच्या फिर्यादवरुन गुन्हा क्र.२९/२००९ प्रमाणे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,१४८,४५२,३२४,३२३,५०४,५०६, ४२७ सहकलम १४९ तसेच, महाराष्ट्र पोलीस कायद्याचे कलम १३५ अन्वये पोलीस स्टेशन, गोंदी येथे गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला, तसेच, जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व संबंधीत साक्षीदाराचे जाबजबाब नोंदवुन तपासाअंती आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र न्यायप्रविष्ट केले.

३. प्रकरण प्रलंबीत असतांना आरोपी क्र.४ साहेबखॉ फत्तेखॉ मयत झाल्याने त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची छायांकीत प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. करीता सदरील प्रकरण हे निशाणी क्र.१ वर दि.२३.११.२०१५ रोजी आदेश पारीत करून त्यांच्याविरूध्द उपशमीत करून इतर आरोपींविरूध्द चालविण्यात आले आहे.

४. आरोपींविरूध्द भा. दं. वि. कलम १४३,१४७,१४८,४५२,३२४, ३२३,५०४,५०६,४२७ सहकलम १४९ तसेच, महाराष्ट्र पोलीस कायद्याचे कलम १३५ प्रमाणे निशाणी क्र.५१ वर दोषारोप निश्चित केला व तो आरोपींना त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगीतला असता त्यांनी तो कबूल नसल्याचे सांगीतले व खटला चालवावा असे प्रतिपादन केले. आरोपींविरूध्द दोषाहार्य पुरावा मिळुन न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अंतर्गतचे बयान वगळण्यात आले.

५. पुढील मुद्दे न्यायालयाच्या विचारार्थ उपस्थित झाले असून त्या मुद्दयांची कारणमिमांसा निष्कर्षासहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि.१२.०३.२००९ रोजी ५.०० वाजेच्या सुमारास मौजे डोनगाव येथे आरोपी यांनी फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव केला व त्याव्दारे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १४३ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ फिर्यादी व साक्षीदार यांच्यावर बलप्रयोग करून दंगा केला व त्याव्दारे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १४७ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ फिर्यादीला मारहाण करण्याच्या उद्देशाने काठया, लोखंडी सळई अशा हत्यारानिशी सज्ज होवून दंगा केला व त्याव्दारे | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १४८ अन्वये गुन्हा केला ? | |
| ४. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ गैरकायदेशीर मंडळी जमवून फिर्यादी व साक्षीदार यांना दूखापत करण्याच्या उद्देशाने त्यांच्या राहत्या घरात बेकायदेशीर प्रवेश करून गृहअतिक्रमण केले व त्याव्दारे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५२ सहकलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | <u>नकारार्थी</u> |
| ५. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ फिर्यादीस काठी, दगड व लोखंडी सळईने मारहाण करून इच्छापूर्वक दूखापत केली व त्याव्दारे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ सहकलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | <u>नकारार्थी</u> |
| ६. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ गैरकायदेशीर मंडळीचे भाग होवून फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून साधी दूखापत केली व त्याव्दारे भारतीय दंड संहिता कलम ३२३ सहकलम १४९ सहकलम अन्वये गुन्हा केला ? | <u>नकारार्थी</u> |
| ७. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ गैरकायदेशीर मंडळी जमवून फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करून अपमानित केले व त्याव्दारे भारतीय दंड संहिता कलम ५०४ सहकलम १४९ अन्वये गुन्हा केला? | <u>नकारार्थी</u> |
| ८. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाच्या पूरस्सरणार्थ फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे मारण्याची धमकी दिली व त्याव्दारे भारतीय दंड संहिता कलम ५०६ सहकलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | <u>नकारार्थी</u> |
| ९. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, | <u>नकारार्थी</u> |

| | | |
|---|---|---|
| | वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना नुकसान पोहोचविण्याचे सामाईक ध्येय प्राप्त करण्याच्या उद्देशाने गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादीच्या घरातील सामानाची नासधुस करून आगळीक केली व त्याव्दारे भारतीय दंड संहिता कलम ४२७ सहकलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | |
| १०. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी बेकायदेशीर जमाव करून जिल्हा दंडाधिकारी, जालना यांचे शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन करून महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा केला ? | <u>नकारार्थी</u> |
| ११. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्र.१ ते ११ बाबत</u>:**

६. भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, १४८, ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सहकलम १४९ तसेच, महाराष्ट्र पोलीस कायद्याचे कलम १३५ अन्वये आरोपींविरुध्द लावण्यात आलेल्या गुन्हयांच्या शाबीतीकरिता अभियोगपक्षाने फिर्यादी व इतर तीन साक्षीदारांना तपासले. परंतु, फिर्यादीने किंवा इतर एकाही साक्षीदाराने घटनेबाबत, त्यांना झालेल्या मारहाणीबाबत किंवा घरातील सामानाची नासधुस केल्याबाबत कोणत्याही प्रकारे अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. तसेच, आरोपी व त्यांच्यामध्ये तडजोड झाल्याचे नमूद करून त्याला पूढे केस चालवायची नसल्याचे सांगीतले. या अनूषंगाने निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला आहे.

७. प्रकरणाच्या दृष्टीने फिर्यादी व जखमी साक्षीदाराचा तोंडी पुरावा हा निर्णायक स्वरुपाचा होता. परंतू, कोणत्याही साक्षीदाराने घटनेबाबत किंवा आरोपींविरुध्द कोणतेही कथन केलेले नाही. आरोपींविरूध्द गुन्हे सिध्द करण्याकरिता सबळ पूरावा

नसल्याने आरोपी निर्दोषमूक्त होण्यास पात्र आहेत. येणेप्रमाणे, मी मुद्दा क्र.१ ते १० साठी नकारार्थी निष्कर्ष नोंदवुन मुद्दा क्र.११ करीता पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

०१. आरोपी क्र.१ नयुम बाबाखॉं पठाण, आरोपी क्र.२ सय्यद मुक्तार स. गफुर, आरोपी क्र.३ अयुब महम्मद पठाण, आरोपी क्र.५ सय्यद गफुर स. अकबर, आरोपी क्र.६ सय्यद रूस्तूम स. गफुर, आरोपी क्र.७ शेख शफीक शे. सालार, आरोपी क्र.८ स. सत्तार स. गफुर, आरोपी क्र.९ शे. अजमोद्दीन शे. सालार, आरोपी क्र.१० सय्यद नजीम स. फयाज, आरोपी क्र.११ शेख रशिदाबी शे. सालार, आरोपी क्र.१२ सय्यद आशानाबी स. गफुर, यांना भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ४५२, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सहकलम १४९ तसेच, महाराष्ट्र पोलीस कायद्याचे कलम १३५ अन्वयेच्या दोषारोपांतून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

०२. आरोपींची जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

०३. जप्त मूद्देमाल पाच कपडे मूल्यहिन असल्याने विहीत कालावधीनंतर नाश करण्यात यावे.

०४. आरोपींनी फौ.प्र.सं.चे कलम ४३७–अ च्या पूर्ततेकामी प्रत्येकी रूपये ५०००/– चे वैयक्तिक बंधपत्र दाखल करावे.

Digitally signed by SIMA SACHIN JAIN
Date: 2026.03.31 11:21:34 +0530

(एस. एस. जैन)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्या.क्र.१),
अंबड

दिनांकः ३०/०३/२०२६

<u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर निवेदन करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :- एस. एम. सपकाळ
न्यायालयाचे नाव :- प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, अंबड
न्यायनिर्णय दिनांक :- ३०.०३.२०२६

स्वा/-
लघुलेखक